अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेकार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ५७०१ ४०९२
दिनांक :-२७/०८/२०१९

---

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
अपिल क्र. अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय,
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय/पुणे मनपा/अपिल/२८७० दिनांक १९/०६/२०१९

१) अपिलकर्ता श्री मिलिंद श्रीराम बोरकर
रा.- प्लॉट क्र.९/१६, श्री नवनाथ हौ.सोसायटी,
जनता वसाहत, जनवाडी, पुणे.

२) जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय,
पुणे महानगरपालिका

श्री मिलिंद श्रीराम बोरकर अपिलार्थी
विरुध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, शिवाजीनगर-घोलेरोड, पुणे मनपा.

---

माहितीचा अधिकार २००५ चे कलम १९(१) अन्वये सुनावणी दि. २०/०८/२०१९

अपिलकर्ता श्री मिलिंद श्रीराम बोरकर यांनी शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाकडील आ.क्र. १०८८७ दिनांक ०८/०३/२०१९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे महानगरपालिका यांचेकडे पुणे शहरातील सं.नं.१२१६ पाटील बंगला, एफ.सी.रोड, शिवाजीनगर पुणे येथील झोपडी धारकांच्या संमतीपत्रे व करारनामे (इंडेक्स २) च्या छायांकित प्रती मिळणेसाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जान्वये अर्ज सादर केला आहे.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे मनपा यांनी अपिलकर्ता यांस त्यांनी नमूद केलेली माहिती त्यांना कार्यालयीन वेळेत दुपारी ३ ते ५ या दरम्यान इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दाखविण्यात येईल तदनंतर त्यांना आवश्यक असणाऱ्या माहितीचे प्रती पान र.रु. २/- प्रमाणे प्रशासकीय शुल्क पुणे मनपा कोषागृहात भरल्यास सदरचे माहितीच्या झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे पत्राने कळविले आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधिची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ०८/०३/२०१९ | ०७/०४/२०१९ | जा.क्र.जीडब्ल्युओ/८७०५ दि.२७/०३/२०१९ ने उत्तर कळविले. | निरंक | २७/०३/२०१९ |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे :- दिनांक ०८/०३/२०१९ रोजी केलेल्या अर्जामधील माहिती दाखविण्यात आलेली नाही व तसेच माहिती आज पर्यंत देण्यात आली नसल्याने सदरचे अपिल करण्यात आले असे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २२/०५/२०१९ | १९/०६/२०१९ | नाही | निरंक | जा.क्र.११४१ दि.२५/०६/२०१९<br>जा.क्र.३२५६ दि.०२/०८/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २०/०८/२०१९ वेळ सकाळी ११.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिका-याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे शहरातील सं.नं.१२१६ पाटील बंगला, एफ.सी.रोड, शिवाजीनगर पुणे येथील झोपडी धारकांच्या संमतीपत्रे व करारनामे (इंडेक्स - २) च्या छायांकित प्रती मिळणेबाबत. | जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांस त्यांनी नमूद केलेली माहिती त्यांना कार्यालयीन वेळेत दुपारी ३ ते ५ या दरम्यान इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दाखविण्यात येईल तदनंतर त्यांना आवश्यक असणाऱ्या माहितीचे प्रती पान र.रु. २/- प्रमाणे प्रशासकीय शुल्क पुणे मनपा कोषागृहात भरल्यास सदरचे माहितीच्या झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे पत्राने कळविले आहे. |

सदरची माहिती अपिलकर्ता यांस उपलब्ध झाली नसल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## -आदेश-

प्रस्तुत प्रकरणी सदरचे अपिल अंशत: मान्य करण्यात येते, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती या आदेशाचे दिनांकापासून पुढील सात दिवसात अपिलार्थी यांचे बरोबर दिनांक व वेळ निश्चित करण सदरची माहिती योग्य ते प्रशासकीय शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात यावी.

उपरोक्त सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला असून सदर अपिल निकालात काढण्यात येत आहे.

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

27/8/19

(किशोर शिंदे)
अपिल प्राधिकारी *तथा*
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका